# नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 19 जानेवारी 2018 रोजी भरलेल्या माहे ऑक्टोबर 2017 महिन्याच्या सर्वसाधारण तहकुब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 02**<br>**दिनांक 16 ऑक्टोबर 2017.** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 03**<br>**दिनांक 16 ऑक्टोबर 2017.** | **स्थायी समितीचा, दिनांक 15 सप्टेंबर 2017 रोजीचा ठराव क्र. 110 व 111 :-**<br>"संदर्भ:- 1) सन्मा. स्थायी समिती सदस्य श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील यांजकडून दिनांक 21 जुलै 2017 रोजीच्या सभेत ठराव क्र. 54 बाबत फेरविचार करणेबाबतची सुचना, दिनांक 08 सप्टेंबर 2017.<br>2) आयुक्तांचे दिनांक 01/07/2017 चे पत्र जा.क्र.नमुंमपा/परवाना विभाग/3554/2017.<br><br>"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, "उपरोक्त विषयासंदर्भात मे. वालोप ॲडव्हेटायजिंग या कंत्राटदाराबरोबर 03 वर्षाच्या कालावधीसाठी किंवा सर्वंकष धोरण मान्य झाल्यास शहरासाठी राबविण्यात येणाऱ्या एकत्रित आर.एफ.पी. (Request for porposal) नुसार जे अगोदर येईल त्याकालावधीपर्यंत देण्यास रु.13,20,000/- इतक्या खर्चाने कलम 73 (ड) नुसार करार करण्यास, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 79 (क) व (ड) अन्वये मंजुरी देण्यात यावी." |
| **ठराव क्र. 141.**<br>**दिनांक 19 जानेवारी 2018.** | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. वालोप ॲडव्हेटायजिंग या कंत्राटदाराबरोबर 03 वर्षाच्या कालावधीसाठी किंवा सर्वंकष धोरण मान्य झाल्यास शहरासाठी राबविण्यात येणाऱ्या एकत्रित आर.एफ.पी. (Request for porposal) नुसार जे अगोदर येईल त्याकालावधीपर्यंत देण्यास रु.13,20,000/- इतक्या खर्चाने कलम 73 (ड) नुसार करार करण्यास, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 79 (क) व (ड) अन्वये मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **नामंजूर.** |
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 16 ऑक्टोबर 2017.** | **स्थायी समितीचा, दिनांक 15 सप्टेंबर 2017 रोजीचा ठराव क्र. 116 :-**<br>"संदर्भ:- आयुक्तांचे दिनांक 08/09/2017 चे पत्र जा.क्र.नमुंमपा/लेखा/1630/2017.<br><br>"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यांत यावी की, "उपरोक्त विषयासंदर्भात तक्ता क्र.5 मध्ये प्रस्तावित केल्यानुसार टेबल क्र. 7 ते 9 मधील 10% व्याजदराने घेतलेल्या कर्जाची दि.30/09/2017 रोजी रक्कम रु.138.34 कोटी परतफेड करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 111 अन्वये मंजुरी देण्यात यावी." |
| **ठराव क्र. 142.**<br>**दिनांक 19 जानेवारी 2018.** | "उपरोक्त विषयासंदर्भात तक्ता क्र.5 मध्ये प्रस्तावित केल्यानुसार टेबल क्र.7 ते 9 मधील 10% व्याजदराने घेतलेल्या कर्जाची दि.30/09/2017 रोजी रक्कम रु.138.34 कोटी परतफेड करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 111 अन्वये मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 07.**<br>**दिनांक 16 ऑक्टोबर 2017.** | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 376, 458 अन्वये प्राप्त अधिकारात तयार केलेली महानगरपालिका उपविधी 2006 मध्ये फेरबदल / सुधारणा करणेबाबत व प्रकरण 18 मधील भाग 4 अनुसूची ड नुसार समाविष्ट व्यवसायांच्या व्यवसाय परवाना शुल्कात वाढ करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 19/09/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/परवाना विभाग/4509/2017. |
| **ठराव क्र. 143.**<br>**दिनांक 19 जानेवारी 2018.** | "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 376, 458 अन्वये प्राप्त अधिकारात तयार केलेली महानगरपालिका उपविधी 2006 मध्ये फेरबदल / सुधारणा करणेबाबत व प्रकरण 18 मधील भाग 4 अनुसूची ड नुसार समाविष्ट व्यवसायांच्या व्यवसाय परवाना शुल्कात वाढ करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, परिच्छेद क्र 1 ते 9 मध्ये सूचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **आयुक्तांकडे परत.** |

<u>**महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी**</u>

**माहे 16 ऑक्टोबर 2017 ची सर्वसाधारण सभा**

| **अ. क्र.** | **नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय** | **विषय क्र. व महिना** | **ठराव क्र. व दिनांक** | **अभिप्राय** |
|---|---|---|---|---|
| **1.** | **श्रीम. उषा पुरूषोत्तम भोईर, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महनगरपालिका नवी मुंबईतील गरीब व गरजू नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असते. परंतु आपल्या रूग्णालयात डॉक्टरांची कमतरता आढळते. आपली महानगरपालिका उत्तम शिक्षण व आरोग्यासाठी नेहमी तत्पर असते. नवी मुंबईची लौकिकता व लोकसंख्या पाहता नवी मुंबई महानगरपालिकेचे स्वत:चे वैद्यकिय महाविद्यालय असावे. त्याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने वैद्यकिय महाविद्यालयासाठी सिडकोकडे भूखंडाची मागणी करून वैद्यकिय महाविद्यालय बांधणे. | 29<br>ऑक्टोबर | 144<br>19/01/2018 | मंजूर |
| **2.** | **श्रीम. उषा पुरूषोत्तम भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 56, कोपरीगाव येथील उड्डाण पुलाखालील जागेवर अतिक्रमण होत आहे. तसेच पुलाच्या खालील जागेवर वाहने उभी करत असतात. वाळूचा साठा व इतर वस्तूचा साठा देखील पुलाखाली केला जातो. रात्री पुलाखाली अंधार असल्याने प्रेमीयुगल बसलेले असतात. चेन खेचणे (Chain Sanching) व लुबाडणे असे अनेक प्रकार पुलाखाली घडलेले आहेत. पुलाखालील जागेच्या शेजारी विविध धर्माच्या स्मशानभूमी आहेत. सदर ठिकाणी अनेक प्रातांतील लोक येत असतात. सद्यस्थितीत पुलाखालील जागा खूप अस्वच्छ आहे व जड वाहने उभी करत असल्याने सदर जागेवर मोठे खड्डे पडले आहेत. तरी उड्डाण पुलाखालील जागेचा गैरवापर होण्या-अगोदर सदर जागेला कुंपन घालून व सुशोभिकरण करणे. | 30<br>ऑक्टोबर | 145<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर येथील मुख्य रस्त्यावरील पथदिव्यांचे खांब बदलून त्या ठिकाणी सोडियम व्हेपर ऐवजी एल.ई.डी. दिवे असलेले सुशोभित खांब लावणे. | 33<br>ऑक्टोबर | 146<br>19/01/2018 | मंजूर |
| 4. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर येथील सर्व मुख्य रस्त्यांची दुरूस्ती करणे. | 34<br>ऑक्टोबर | 147<br>19/01/2018 | मंजूर |
| 5. | **श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>सिडकोने जवळपास 90 टक्के खेळाची मैदाने ही शाळा महाविद्यालयांच्या संस्थांना काही अटी शर्तीवर दिलेली आहेत. त्यामध्ये मैदाने सायंकाळी व सुट्टीच्या दिवशी शाळा महाविद्यालये बंद असताना सर्वसामान्य जनतेला वापरासाठी खुले ठेवण्याची बंधनकारक अट आहे असे असूनही बहूतांश शैक्षणिक संस्था खेळाची मैदाने ही स्थानिक जनतेला वापरासाठी खुले करून देण्यास टाळत आहेत. तसेच महत्वाची बाब म्हणजे सर्वसाधारणपणे शैक्षणिक सत्र हे सकाळ व दुपार अशा दोन सत्रात होत असल्याने दुपारच्या सत्रातील युवा वर्गास स्थानिक स्तरावर मैदानी खेळांसाठी सकाळच्या कालावधीत मैदानेच उपलब्ध नसल्याचे दिसून येते. यामुळे आजच्या स्पर्धात्मक जीवनात शहरातील मध्यमवर्गीय कुटूंबातील बालके व युवा वर्ग एका आवश्यक सुविधेपासून वंचित राहत आहेत. ही वस्तुस्थिती विचारार्थ घेऊन महापालिकेने स्थानिक नियोजन प्राधिकरण व शहराची पालक संस्था म्हणून प्राप्त अधिकाराचा वापर करून तसेच कायदेशीररित्या सिडकोने ज्या संस्थांना खेळाच्या मैदानांचे आरक्षित भूखंड विना निविदा पध्दतीने दिलेले आहेत. असे मैदानांसाठीचे भूखंड अधिग्रहीत करून ते नागरीकांना सकाळ, दुपार व संध्याकाळ मैदानी खेळांसाठी उपलब्ध करण्याची कार्यवाही व कार्यपुर्तता करणे. | 55<br>ऑक्टोबर | 148<br>19/01/2018 | मंजूर |
| 6. | **श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>महापालिका मुख्यालयाचा आवार परिसर हा सुंदर व प्रेक्षणिय असल्याने याठिकाणी नवी मुंबईतील तसेच आसपासच्या शहरातील नागरीक सायंकाळी तसेच सुट्टीच्या दिवशी एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून भेटीस येत असल्याचे दिसून येते. परंतु दुर्दैवाने अशा बहुचर्चित व लोकप्रिय झालेल्या स्थळी, स्थळालगत सुलभ सार्वजनिक प्रसाधान व्यवस्था नसल्याने नागरीकांची विशेषत: महिला वर्गाची कुचंबणा होते. तरी मनपाकडून तातडीने मुख्यालय वास्तुच्या सौदर्याला शोभेल व बाधा पोहचणार नाही अशा स्वरूपातील सुलभ प्रसाधान गृहाची तरतूद करणे. | 56<br>ऑक्टोबर | 149<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **7.** | **श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>महापालिकेने फिफा स्पर्धेच्या निमित्ताने शासनाच्या ताब्यातील रस्ते व त्यालगतच्या मोकळ्या जागा यांच्या सुशोभिकरण कारणासाठी सर्वसाधारण अथवा विशेष बाब म्हणून निधी वापरण्यासाठी जी कार्यपध्दत अंगिकारलेली आहे. तिच कार्यपध्दत व ते तत्व अंगिकारून सिडकोने उभारलेल्या वसाहतींच्या कंडोमिनियम अंतर्गत नागरी सेवा सुविधांची कामे करण्याची कार्यवाही, कार्यपुर्तता करणे. | 57<br>सप्टेंबर | 150<br>19/01/2018 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**